# बीकेसी ते धारावी दरम्यान भुयारीकरणाचे काम पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कोरोनाचा प्रादुर्भाव सुरु असतानाही मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (एमएमआरसी) मेट्रो-३ मार्गिकेच्या कामाची गती कायम ठेवली असून गेल्या दोन दिवसांमध्ये दोन भुयारांची काम पूर्ण केली आहेत. यामध्ये बुधवारी गोदावरी-३ टनेल बोरिंग मशीनद्वारे (टीबीएम) बीकेसी ते धारावी दरम्यान काम पूर्ण झाले तर मंगळवारी सिद्धिविनायक मंदिर ते वरळी दरम्यानचे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले आहे.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गिकेतील बीकेसी ते धारावी या मेट्रो स्थानकांना जोडण्याच्या भुयारीमार्गाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. हे काम गेल्या नऊ महिन्यांपासून सुरु होते. यासह मार्गिकेच्या पॅकेज-५ मध्ये सिद्धिविनायक ते वरळी दरम्यानचे १.२८ किमी भुयारीकरणाचे कामही मंगळवारी रात्री पूर्ण करण्यात आले आहे. यासाठी ९१६ सेगमेंट रिंग्जचा वापर करण्यात आला.

### आतापर्यंत २७ ब्रेकथ्रू

३३ किमी लांबीच्या मार्गिकेवर एकूण ३२ टनेल तयार होणार आहेत. टीबीएमच्या साहाय्याने आतापर्यंत ३२ पैकी २७ टनेलचे काम पूर्ण करण्यात आले आहे. मार्गिकेमध्ये जमिनीच्या खाली सुमारे २२ मीटरपर्यंत मेट्रो मार्गिका तयार करण्यासाठी सतरा टीबीएमचा वापर केला जात आहे. एमएमआरसीने येत्या काही महिन्यांत संपूर्ण टनेलचे काम पूर्ण करण्याचा निर्णय घेतला आहे.